तीन आनंदी शिकारी

सुसान जेफर्स, मराठी: संजीवनी कुलकर्णी



तीन आनंदी शिकारी

सुसान जेफर्स, मराठी: संजीवनी कुलकर्णी



तीन शिकारी आनंदाने
शिकारीला निघाले





सेंट डेव्हिडचा दिवस आहे,

चला साजरा करू म्हणाले.

दिवसभर शोध-शोधूनही,
शिकार मिळायचं नाव नाही.





मग दिसलं एक जहाज.

वाऱ्यावर डुलत आरामात.



एकाला ते जहाज वाटलं
दुसरा म्हणाला,गप्प बस.
तिसरा म्हणे घरात चूल पेटलीय
त्यातून धुराणी उडतीय वर बघ.



आख्खी रात्रभर शोधूनही
शिकार दिसायचं नाव नाही.
चंद्र दिसे मात्र आकाशात फिरताना
वाऱ्यासंगे नाचतनाचत ढगांमागे पळताना

एक म्हणाला चंद्र्य तो.
दुसरा म्हणाला, काही काय?
तिसरा म्हणे अर्धी भाकरी
दुसरंतिसरं काय नाय.

आख्खा दिवस शिकार झाली,
काहीसुद्‌धा गावलं नाही
एका झाडीत साळींदर
पुढे गेल्यावर शंका आली.





त्याला सोडून ते पुढे निघाले.

एक म्हणाला अरे, साळींदर
दुसरा म्हणे, अरे वेड्या.
तिसरा म्हणे गादीमध्ये
सुया खोचल्यात वाकड्यातिकड्या



सगळी रात्र शोधण्यात गेली
काही सुद्धा नाही भेटले
पहाटे एका शेतात ससा होता,



त्याला सोडून ते पुढे निघाले.



तीन शिकारी आनंदाने
शिकारीला निघाले
सेंट डेव्हिडचा दिवस आहे,
चला साजरा करू म्हणाले.